दिनांक २३.०५.२०२६.

**प्रेस नोट**

१) लोकसेवक उमेश मधुकर राऊत, वय ३८ वर्ष, पद भुकरमापक (सर्वेअर), उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, हिंगोली २) अविनाश नंदकिशोर गोरे, वय ४४ वर्ष, पद– भुकरमापक (सर्वेअर), उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, हिंगोली यांनी १५,०००/– रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १०,०००/– रूपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन हिंगोली शहर, गुरनं ३५१/२०२६ कलम ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल केले बाबत.

---

दिनांक २२.०५.२०२६ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांची मौजे बासंबा येथे शेत गट क्रमांक ६५८ मध्ये ३६ आर शेतजमीन आहे. सदर शेत जमीनीची मोजणी करण्यासाठी तक्रारदार यांनी उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, हिंगोली येथे प्रकरण दाखल केले होते. यातील आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे वर नमुद शेत जमीनीची मोजणी केली होती. परंतु तक्रारदार यांना उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, हिंगोली यांचेकडुन शेत जमीनीची मोजणी केल्याबाबत मोजणी शिटची प्रत अद्याप पावेतो मिळालेली नाही. तक्रारदार यांना त्यांचे शेत जमीनीची मोजणी शीट ची प्रत देण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक उमेश राऊत हे तक्रारदार यांचेकडे १५,०००/– रूपये लाचेची मागणी करत आहे. अशी तक्रार कार्यालयास प्राप्त झाली.

दिनांक २२.०५.२०२६ रोजी लाच मागणी पडताळणी करण्याकरीता तक्रारदार यांना, पंच क्रमांक १ यांचे सह लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता रवाना केले. उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, हिंगोली येथे दोन्ही आरोपी लोकसेवक यांची भेट झाली. त्यावेळी आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडुन यापुर्वी ४,०००/– रूपये घेतल्याचे मान्य केले. तसेच मौजे बासंबा शेत शिवार गट क्रमांक ६५८ ची मोजणी शीट ची प्रत तक्रारदार यांना देणेकरीता आरोपी यांनी तक्रारदार यांचेकडे उर्वरित राहीलेले ११,०००/– रूपये लाच मागणी करून, तडजोडी अंती १०,०००/– लाच मागणी केल्याचे पंच क्रमांक १ यांचे समक्ष लाच मागणी पडताळणी कारवाई मध्ये निष्पन्न झाले.

दिनांक २२.०५.२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, हिंगोली येथे आरोपी लोकसेवक क्रमांक २ यांनी तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष १०,०००/– लाचेची रक्कम स्वत: स्विकारली असता, त्यांना लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडण्यात आले असुन त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन हिंगोली शहर, गुरनं ३५१/२०२६ कलम ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो नांदेड, श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्रीमती सुलभा राऊत, सपोउपनि महमद युनुस, विजय शुक्ला, पोह/भगवान मंडलीक, पोह/राजाराम फुपाटे, गोविंद शिंदे, पो.शि./शिवाजी वाघ, अमोल जाधव, विनोद पुंडगे, व चापोह अकबर शेख, सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो यांचे मदतीने यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली तर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकिय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली यांचेशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहीजे असल्यास खालील नमुद क्रमांकावर संपर्क साधावा.

मा. संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मोबा. क्रमांक ९५४५५३१२३४/९२२६४८४६९९.
श्री विकास घनवट, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली, मोबा. क्रमांक ९८२२२५९९३२
टोल फ्रि क्रमांक १०६४, लॅन्ड लाईन क्रमांक ०२४५६–२२३०५५.
व्हॉटसअॅप क्रमांक :– ९३५९१२८८८९/९४२२०६१०६४.

23/05

( विकास घनवट )
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली.

CamScanner